## महाराष्ट्र शासन

कार्यालय - सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण,जिल्हाधिकारी कार्यालय परिसर,प्रशासकिय इमारत,दुसरा माळा,अकोला

ई मेल-sdswo_akl @rediffmail.com (दूरध्वनी फॅक्स ०७२४-२४२६४३८)


जाक्र.सआ/अकोला/भासशि/प्रलंबित अर्ज/ 3352 /२०१६ अकोला. दिनांक.१३ डिसेंबर २०१६

महत्वाचे/कालमर्यादा.

प्रति,

प्राचार्य,

.............................................

.............................................

..............................जि-अकोला

विषय :- सन.२०१५-१६ व त्यापूर्वीचे महाविद्यालयस्तरावर प्रलंबित असलेले भारत सरकार शिष्यवृत्ती आणि शिक्षण फी परिक्षा फी चे प्रलंबित आवेदनपत्राबाबत...

संदर्भ :-

१) या कार्यालयाचे पत्र क्रमांक. ११८ दिनांक.१९ जानेवारी २०१६

२) मा.आयुक्त,समाजकल्याण आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य पुणे-१ यांचे पत्र क्रमांक. सकआ/शिक्षण/परिपत्रक/ईस्कॉल/२०१६-१७/१६९८ दिनांक.२६ एप्रिल २०१६

३) या कार्यालयाचे पत्र क्रमांक. १४४७ दिनांक. २ मे २०१६

४) या कार्यालयाचे पत्र क्रमांक. २५२९ दिनांक. ११ मे २०१६

५) मा.आयुक्त,समाजकल्याण आयुक्तालय,म.रा.पुणे-१ यांचे पत्र क्र.२५८१ दि.१२/७/१६

६) या कार्यालयाचे पत्र क्रमांक.२१९६ दिनांक.१५ जूलै २०१६

७) मा.प्रादेशिक उपायुक्त,समाजकल्याण,अमरावती विभाग अमरावती यांचे पत्र क्र. प्राऊपा/सकवि/अम/शिष्यवृत्ती/प्रप्रकरणे/निकाली/२०१३-१७/४३६० दि.२७/७/२०१६

८) या कार्यालयाचे पत्र क्रमांक.२४१३ दिनांक. ११ ऑगस्ट २०१६

९) मा.आयुक्त,समाजकल्याण,समाजकल्याण आयुक्तालय,म.रा.पुणे-१ यांचे पत्र क्रमांक. सकआ/शिक्षण/विद्यार्थी अर्ज नुतनीकरण/३३८७/दिनांक.८ सप्टेंबर २०१६

१०) या कार्यालयाचे पत्र क्रमांक.२६८१ दिनाक.१९ सप्टेंबर २०१६

११) मा.आयुक्त,समाजकल्याण आयुक्तालय,रा.पुणे यांचे पत्र क्र.८२५ दि.१५/११/२०१६

१२) ई-स्कॉलरशिपचे जिल्हा पोर्टेलवरील माहितीचे अनुषंगाने

१३) या कार्यालयाचे पत्र क्रमांक.३१६४ दिनांक. १७ नोव्हेंबर २०१६

महोदय,

वरील विषयाच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यांत येते की, सामाजिक न्याय विभागाने शैक्षणिक सत्र २०११-२०१२ पासून मागासवर्गीय विद्यार्थ्यानां ऑनलाईन शिष्यवृत्ती देण्याची योजना कार्यान्वित करण्यांत आलेली असून त्यानुसार त्यांची अंमलबजावणी जिल्हास्तरावरुन या कार्यालयामार्फत करण्यांत येत आहे. याबाबत सन.२०१५-२०१६ या शैक्षणिक वर्षामध्ये जिल्हास्तरावर / तालूकास्तरावर वेगवेगळया स्वरुपात बैठकीचे आयोजन करुन जिल्हायातील कनिष्ठ ,वरिष्ठ व व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयाचे प्राचार्य / भासशि योजनेचे काम करणारे कर्मचा-यांना ऑनलाईन शिष्यवृत्ती बाबत प्रात्यक्षिकासह माहिती देण्यांत आलेली आहे. तसेच सन.२०१४-१५ व २०१५-१६ या शैक्षणिक वर्षातील प्रलंबित आवेदनपत्रे निकाली काढणे करीता या कार्यालयाचे संदर्भिय पत्र क्रमांक. (१) अन्वये दिनांक. १ फेब्रूवारी २०१६ ते १५ फेब्रूवारी २०१६ या कालावधीत तालूकानिहाय कॅम्पचे आयोजन करण्यांत आलेले होते.

त्याप्रमाणे जिल्हयातील बहूतेक महाविद्यालयांनी त्यांचेकडील प्रवेशित असलेल्या विद्यार्थ्याचे भारत सरकार शिष्यवृत्ती बाबतची आवेदनपत्रे ऑनलाईन या कार्यालयाकडे सादर करुन त्यांची देयकेसुध्दा तयार करण्यांत आलेली आहे व अशा मागासवर्गीय विद्यार्थ्यांची शिष्यवृत्तीच्या रक्कमा त्यांचे वैयक्तिक बॅक खात्यावर तर महाविद्यालयाच्या शिक्षण फी परिक्षा फी

R. Estt./ Gad./ Acad. (Agri)



O/o. REGISTRAR No. R|1037

**महाराष्ट्र शासन**
कार्यालय - सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण,जिल्हाधिकारी कार्यालय परिसर,प्रशासकिय इमारत,दुसरा माळा,अकोला
ई मेल-sdswo_akl @rediffmail.com (दूरध्वनी फॅक्स ०७२४-२४२६४३८)

च्या महाविद्यालयाच्या खात्यावर जमा करण्यांत आलेल्या आहे. पंरतु शैक्षणिक सत्र.२०१४-१५ व २०१५-२०१६ संपलेले असूनही उक्त शैक्षणिक सत्रामधील महाविद्यालयात प्रवेशित असलेल्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे भारत सरकार शिष्यवृत्ती / शिक्षण फी परिक्षा फी आवेदनपत्राची छाननी करुन अद्यापही या कार्यालयाकडे सादर केलेली नाहीत

तसेच संदर्भिय पत्र क्रमांक.(११) अन्वये मा.आयुक्त,समाजकल्याण,पुणे यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या सभेमध्ये दिलेल्या सुचन्या व ई-स्कॉलरशिपचे पोर्टलवर दिलेल्या सुचनेच्या अनुषंगाने सुचित करण्यांत येत की, भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती व शिक्षण फी परिक्षा फी योजनेचे दिनांक.३१ मार्च २०१५ पूर्वीचे जे अर्ज महाविद्यालय स्तरावर प्रलंबित आहेत ते सर्व अर्ज दिनांक.१५ डिसेंबर २०१६ पर्यन्त या कार्यालयाकडे सादर करण्यांत यावेत.सदर प्रलंबित अर्ज *दिनांक. १५ डिसेंबर २०१६* पर्यन्त सादर न झाल्यास सदर अर्ज मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती व शिक्षण फी परिक्षा फी या योजनेस पात्र नसल्याचे गृहित धरुन **Reject** करण्यांत येतील वऑनलाईन संगणक प्रणाली मधून देखील **Delete** करण्यांत येतील याची गांभिर्यपूर्वक नोंद घेण्यात यावी.

तेव्हा आपणांस पुनश्च कळविण्यांत येते की, केवळ आपण शिष्यवृत्ती बाबतच्या आवेदनपत्रावर वेळीच कार्यवाही न केल्याने व सदर आवेदनपत्रास ऑनलाईन स्विकृती/पडताळणी/मंजूरी न केल्यामुळे मागासवर्गीय विद्यार्थी शिष्यवृत्ती वेळेत मिळण्यापासून वंचित राहिलेले आहे. तेव्हा सन.२०१४-१५ व २०१५-२०१६ या वर्षातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे आवेदनपत्राची छाननी करुन सदरची आवेदनपत्रे हॉर्डकापी व विवरण पत्र " बी " तसेच आवेदनपत्रे ऑनलाईन प्रणालीव्दारे या कार्यालयाकडे *दिनांक.१५ डिसेंबर २०१६* पूर्वी सादर न केल्यास सदरचे अर्ज शिष्यवृत्ती / शिक्षण फी परिक्षा फीसाठी पात्र नसल्याचे गृहीत धरुन सिस्टीमवरुन काढून टाकण्याबाबत कार्यवाही करण्यांत येईल. अशा कार्यवाही अभावी मागासवर्गीय विद्यार्थी शिष्यवृत्ती पासून वंचित राहिल्यास त्याबाबतची सर्व जबाबदारी महाविद्यालयाची राहील अशा प्रसंगी कोणत्याही मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून महाविद्यालय शुल्क आकारणी करता येणार नाही. यांची आपणांस जाणिव करुन देण्यांत येत आहे.

(शरद चव्हाण)
सहाय्यक आयुकत,
समाजकल्याण,अकोला.

प्रतिलीपी माहितीस्तव सविनय सादर.

१) मा.आयुक्त,समाजकल्याण, आयुक्तालय महाराष्ट्र राज्य,पुणे-१
२) मा.संचालक,विजाभज,विमाप्र व इमाव कल्याण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,पुणे-१
३) मा.कुलसचिव,संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती
४) मा.कुलसचिव,डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ,अकोला
५) मा.सहसंचालक,उच्च शिक्षण,अमरावती विभाग अमरावती
६) मा.सहसंचालक,तंत्र शिक्षण,अमरावती विभाग अमरावती.
७) मा.उपसंचालक,शिक्षण,अमरावती विभाग अमरावती
८) मा.प्रादेशिक उपायुक्त,समाजकल्याण,अमरावती विभाग अमरावती.
९) शिक्षणाधिकारी (माध्यमिक ) जिल्हा परिषद,अकोला

(शरद चव्हाण )
सहाय्यक आयुकत,
समाजकल्याण,अकोला.

*D:\gopal 1- GOI CAMP LETTER -AKOLA 648*